आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक दुपारी ३.००वाजता
२ फेब्रुवारी २०२३ – गुरुवार

**ठळक बातम्या**

- हिंडेनबर्ग संस्थेनं प्रकाशित केलेल्या अहवालावरुन संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधकांचा प्रचंड गदारोळ / गोंधळामुळे सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित

- विधानपरिषदेच्या 5 मतदारसंघातल्या निवडणुकीची मतमोजणी सुरु / कोकण शिक्षक मतदारसंघात भाजपा उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे विजयी

- भारतीय अन्न महामंडळाच्या ई लिलावात पहिल्याच दिवशी 8 लाख मेट्रीक टन गव्हाची विक्री

**आणि**

- शहरातलं वाढतं बांधकाम आणि मंदावलेल्या वाऱ्यांमुळे मुंबईच्या हवामानाच्या दर्जात घट

**<><><><><><>**

अदानी उद्योगसमूहाबाबत हिंडेनबर्ग संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालावरुन संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. त्यामुळं दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरुवातीला २ वाजेपर्यंत आणि नंतर संपूर्ण दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुकच्या सदस्यांनी सभागृहाचं कामकाज सुरु होताच याप्रकरणी चौकशीची मागणी करत हौद्यात धाव घेतली. सदस्यांनी आपापल्या जागी परत जावं असं सभापती ओम बिरला यांनी वारंवार

सांगूनही हे सदस्य हौद्यातूनच घोषणा देत राहिले. गोंधळामुळे कामकाज चालवणं अशक्य झालं तेव्हा सभागृहाचं कामकाज सुरुवातीला 2 वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.

राज्यसभेत अनेक सदस्यांनी स्थगन प्रस्तावाची नोटीस दिली होती. भारतीय आयुर्विमा महामंडळ, आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी पैसा गुंतवलेल्या कंपन्यांचे समभाग बाजारात कोसळत असल्याबद्दल चर्चेची मागणी करणारा हा स्थगन प्रस्ताव होता. हा प्रस्ताव योग्य पद्धतीने मांडला नसल्याचं कारण देऊन अध्यक्ष जगदीप धनखड यांनी तो फेटाळून लावला. तेव्हा काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, आप, समाजवादी पार्टी आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी गदारोळ सुरु केला. अध्यक्षांनी सदस्यांना शांतता राखायला सांगितलं. मात्र घोषणाबाजी चालूच राहिल्याने सभागृहाचं कामकाज सुरुवातीला दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

**<><><><><><>**

राज्यातल्या विधानपरिषदेच्या ३ शिक्षक आणि २ पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीला आज सुरुवात झाली. कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतमोजणीला नेरुळ इथं सुरुवात झाली असून, आत्तापर्यंत ९८ मतपेट्या उघडण्यात आल्या आहेत. ३० जानेवारीला पार पडलेल्या या निवडणुकीत कोकणातून ९१ पूर्णांक २० शतांश टक्के इतके मतदान झालं होत. अमरावती पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीला बडनेरा इथल्या नेमानी गोडाऊन इथं सुरुवात झाली आहे. अनेक उमेदवार मतमोजणी ठिकाणी दाखल झाले असून, दुपारी चार नंतर चित्र स्पष्ट होण्याचे संकेत आहेत. नाशिक पदवीधर मतदारसंघ निवडणूकीच्या मतमोजणीसही सुरुवात झाली आहे. नाशिक पदवीधर

मतदारसंघासाठी नाशिक विभागात ४९ पूर्णांक ३२ शतांश टक्के मतदान झाले असून याची मतमोजणी सय्यद पिंप्री इथल्या गोदामात सुरू झाली आहे.

<><><><><>

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीत भाजपचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे पहिल्या पसंतीच्या क्रमानुसार विजयी झाले आहेत. या निवडणुकीत ३५ हजार ६९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावलं. त्यापैकी १ हजार ६१९ मते बाद झाल्यानं ३३ हजार ४५० मतं वैध ठरली. विजयासाठी पहिल्या पसंतीची १६ हजार ७२६ मतं आवश्यक होती. भाजपा उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना २० हजार ६४८ मतं मिळाल्यानं ते विजयी झाले. विद्यमान आमदार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बाळाराम पाटील यांना १० हजार ९९७ मतं मिळाली. मात्र म्हात्रे यांच्या विजयाची अधिकृत घोषणा झालेली नाही. या विजयाबद्दल उद्योग मंत्री उदय सामंत यांनी ज्ञानेश्वर म्हात्रे यांचं अभिनंदन केलं आहे. हा विजय म्हणजे शिंदे-फडणवीस सरकारवर कोकणवासियांनी दाखवलेला विश्वास असल्याचं सामंत यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

आज जागतिक पाणथळ जागा दिवस आहे. पर्यावरणाच्या दृष्टीनं जैवविविधता जपण्यासाठी पाणथळ जागांचं महत्त्व ठसवण्याकरता हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. दक्षिण आशियातली सर्वाधिक रामसर स्थळं भारतात असून सुमारे 13 लाख हेक्टर क्षेत्र त्याखाली आहे. मँग्रोव्ह जतन आणि संवर्धनासाठी मिष्टी या नवीन उपक्रमाची घोषणा कालच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात केली.

<><><><><>

काल संसदेत मांडलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात पर्यावरण विषयावर काम करणाऱ्यांसाठी विशेष समूह प्रकल्प तयार करण्याचं धोरण निश्चित झाल्यानं, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्यांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. पर्यावरण संरक्षण क्षेत्रात काम करणारे तज्ञ संजय गुरव म्हणाले....

**होल्ड -बाईट- संजय गुरव**

**<><><><><><>**

यावर्षीच्या अर्थसंकल्पात औषध निर्माण उद्योगासाठीच्या तरतुदीत साडेअकरा पट वाढ केल्याबद्दल रसायन आणि खते मंत्री मनसुख मांडविय यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचं कौतुक केल आहे. अमृत काळ अर्थसंकल्प उद्योगाला अधिक उंचीवर नेईल, अशी आशा मंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. २०२२-२३ मधले १०० कोटी रुपयांच्या तुलनेत २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी औषध उद्योगासाठी १ हजार २५० कोटी रुपये दिले आहेत.

**<><><><><><>**

लातूर इथल्या रेल्वे डबे निर्मिती कारखान्यात वंदे भारत एक्स्प्रेसची निर्मिती केली जाणार असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. दोन वर्षांपूर्वी हा कारखाना सुरू झाला असला तरी कोणत्याही मोठ्या प्रकल्पातल्या रेल्वे गाड्यांची बांधणी अद्यापही होऊ शकलेली नाही. मात्र आता वंदे भारतची निर्मिती या कारखान्यात सुरू होणार आहे. लातूरसह चेन्नई, सोनीपत, रायबरेली इथं वंदे भारत एक्सप्रेसची निर्मिती होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत स्वदेशी हायड्रोजन ट्रेनची सुरुवात डिसेंबर २०२३ मध्ये करण्यात येणार असून, यावर्षी बुलेट ट्रेनच्या कामावर विशेष लक्ष केंद्रीत करणार असल्याची माहितीही रेल्वेमंत्र्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

भारतीय अन्न महामंडळाने देशांतर्गत खुल्या बाजारात पहिल्याच दिवशी 8 लाख मेट्रीक टन गव्हाची विक्री केली. देशातल्या 22 राज्यांमधे ई- लिलाव पद्धतीने ही विक्री झाली. केंद्रीय साठ्यातल्या एकूण 25 लाख मेट्रीक टन गव्हापैकी 22 लाख मेट्रीक टन गहू अन्न महामंडळानं लिलावाद्वारे विक्रीला काढला आहे. देशभरात गहू आणि गहूपिठाचे दर वाढत असल्याच्या पार्शवभूमीवर त्यावर नियंत्रण ठेवण्याकरता हा लिलाव केला जात असल्याचं केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयानं सांगितलं आहे. येत्या मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत दर बुधवारी हा लिलाव होणार असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यात भिवंडीतल्या तळवली नाका इथं ज्वलनशील रसायनाने भरलेल्या ड्रमचा स्फोट होऊन दोन भंगार विक्रेत्यांचा मृत्यू झाला. ठाणे महापालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाने ही माहिती दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचून आग विझवली. भिवंडी निजामपूर पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

<><><><><>

अहमदनगर जिल्ह्यात राहुरी इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठात, जागतिक बँक अर्थसहाय्यीत उच्च शिक्षण प्रकल्प आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या वतीनं, हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत भविष्यकालीन कृषी तंत्रज्ञान, या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. कृषी क्षेत्रातील आयओटी, ड्रोन आणि रोबोटीक्स इत्यादींचा वापर पिकांचं निरीक्षण, सर्वेक्षण आणि प्रक्षेत्राचे नमुने तसंच डिजिटल

तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><><>**

राज्यातल्या अंगणवाडी मदतनीस आणि सेविकांची अंतिम निवड करण्याचा अधिकार बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे देण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार, सेविकांसाठी शैक्षणिक पात्रता दहावीऐवजी बारावी करण्यात येणार असून, त्यासंबंधीच्या शासन निर्णयाला अंतिम मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ भरतीला सुरवात होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

राज्यातील बाजार समित्यांमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांना अद्यावत सुविधा मिळाव्यात यासाठी सर्व बाजार समित्यांच्या पायाभूत सुविधांचा तपशीलवार आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई इथं दिले.

सह्याद्री अतिथीगृह इथं राज्याच्या पणन विभागाची आढावा बैठक मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल झाली तेव्हा ते बोलत होते.

काळाची गरज लक्षात घेऊन बाजार समित्यांचा पुनर्विकास, तिथं येणारे शेतकरी, मजूर, कामगार यांच्यासाठी सुविधा निर्माण कराव्यात असे निर्देशही शिंदे यांनी दिले. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी पाण्याची उपलब्धता, स्वच्छता, अंतर्गत रस्ते बांधणी आणि इतर सुविधांचा आराखडाही तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**<><><><><><>**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे राज्यभरात पर्यटक निवासस्थानी तृणधान्य महोत्सवांचा प्रारंभ काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आला. राज्यातल्या पर्यटक निवासामध्ये आता बाजरी, ज्वारीच्या भाकरीसह, लसणाची चटणी आणि पौष्टिक तृणधान्यापासून तयार केलेले पदार्थ उपलब्ध करून देण्याबाबतच्या सूचना व्यवस्थापनाला दिल्या असल्याचं लोढा यांनी यावेळी सांगितलं. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत औरंगाबाद, अजिंठा, भंडारदरा, नाशिक, महाबळेश्वर,लोणार,बोधलकसा,तारकर्ली आणि गणपतीपुळे इथल्या पर्यटक निवासस्थानी या महोत्सवांचं आयोजन केलं जाणार आहे.

<><><><><>

३०४ एवढ्या हवामान गुणवत्ता निर्देशकांनुसार काल मुंबईतल्या हवेचा दर्जा अत्यंत खालावला असल्याची नोंद झाली आहे. कमी तापमान आणि मंदावलेले वाऱ्यांसह बांधकामाची कामे तसंच शहरातील संथ गतीनं होणारी वाहतूक यामुळे धुळीचं प्रदूषण वाढत असल्याचं मत तज्ञांनी व्यक्त केलं आहे. येत्या काही दिवसांत मुंबई आणि परिसरातील तापमानात पुन्हा एकदा घट होण्याची शक्यता हवामान तज्ञांनी वर्तवली आहे.

<><><><><>

कविवर्य राजा बढे लिखित ‘जय जय महाराष्ट्र माझा’ या गीताला राज्य गीताचा दर्जा देण्याचा शासन निर्णय काल जारी झाला. या मूळगीतातले दोन चरण राज्यगीत म्हणून घोषित करण्यात आले असून, येत्या १९ फेब्रुवारी पासून म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनापासून हा निर्णय लागू होईल. सर्व शासकीय

कार्यक्रमांमधे १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त होणाऱ्या ध्वाजरोहण कार्यक्रमात शाळांमधे दैनिक सत्र सुरु होण्यापूर्वी राष्ट्रगीतावर हे राज्यगीत गायलं किंवा वाजवलं जाईल. राज्यशिक्षण मंडळाच्या पाठयपुस्तकांमधे येत्या शैक्षणिक वर्षापासून या राज्यगीताचा समावेश होईल. राष्ट्रगीताच्या सन्मानार्थ पाळल्या जाणाऱ्या सर्व बाबी राज्यगीताबाबतही लागू होतील, मात्र राष्ट्रगीताचा मान सन्मान आणि प्रतिष्ठा सर्वोच्च राहील, असं या आदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

सिंधुदुर्ग जिलह्यात आंगणेवाडी इथल्या भराडी देवी यात्रेला आता दोन दिवस उरले आहेत. या यात्रेसाठी बाहेरुन मोठ्या संख्येने भाविक येतात या पार्श्वभूमीवर आंगणेवाडीत जय्यत तयारी सुरु आहे. या यात्रेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नारायण राणे आदी नेतेमंडळी उपास्थीत राहणार आहेत. यंदा भाविकांना देवीचे दर्शन नऊ रांगांद्वारे होणार असून विशेष दक्षता घेण्यात येणार असल्याचं ग्रामस्थ मंडळाच्या प्रतिनिधींनी सांगितलं. कोकण रेल्वेने मुंबईहून येणाऱ्या चाकरमान्यांसाठी जादा फेऱ्यांच नियोजन करण्यात आल असून शुक्रवारी रात्री हि गाडी मुंबईहून सुटणार आहे. या जादा गाडीला सिंधुदुर्गातल्या सर्व स्थानकांवर थांबे देण्यात आले आहे. तसेच रेल्वेच्या वेळापत्रकानुसार कणकवली आणि ओरोस स्टेशन वरून आंगणेवाडीसाठी जादा बस फेऱ्यांच नियोजन एसटीकडून करण्यात आले आहे.

**<><><><><><>**

फिंगर बाउल मध्ये हात धुण्याची पद्धत मौखिक आरोग्याच्या दृष्टीनं अयोग्य असल्यानं, दंत वैद्यांनी ही पद्धत बंद करण्यासाठी जनजागृती करावी असं आवाहन राज्यपाल कोश्यारी यांनी केलं आहे. एक्सलन्स इन डेन्टिस्ट्री पुरस्काराच्या वितरण

समारंभावेळी ते बोलत होते. 'मेडियुष' या दंतवैद्यांच्या संघटनेच्या वतीनं हे पुरस्कार देण्यात आले असून, यावेळी महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ मुख अभियानाच्या बोधचिन्हाचं तसंच बोधवाक्याचं राज्यपालांच्या हस्ते अनावरण करण्यात आलं.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात आज सकाळी मुंबई-अहमदाबाद महामार्गावर ट्रकच्या धडकेत गुजरातमधील एका ३८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. अरुणकुमार पारेख हे मुंबईच्या दिशेने येत असताना सकाळी साडे नऊच्या सुमाराला विरारजवळ टायर फुटल्यानं हा अपघात झाला अशी माहिती मांडवी पोलीसांनी दिली. यात पारेख यांचा जागीच मृत्यू झाला.

<><><><><>

दादर इथल्या स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात व्यंगचित्रकारांचे बाळासाहेब' या जागतिक व्यंगचित्र प्रदर्शनाच आयोजन करण्यात आलं आहे. कार्टूनिस्टस् कंबाईन आणि शिवप्रेरणा यांनी हे आयोजन केल आहे. 'व्यंगचित्रकारांचे बाळासाहेब' या जागतिक व्यंगचित्र प्रदर्शनात अमेरिका, चीन, पोलंड, युक्रेन, ब्राझील, रुमानिया, इराक अशा जगभरातील देशातून आलेली निवडक व्यंगचित्रं पहायला मिळतील. माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी यांनी आज 'व्यंगचित्रकारांचे बाळासाहेब' जागतिक व्यंगचित्र प्रदर्शनाचं उद्धघाटन केलं. रसिकांना आज आणि उद्या सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत विनामूल्य व्यंगचित्र प्रदर्शन पाहता येणार आहे.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडीतील तळवली नाका इथं काल सकाळी ज्वलनशील रसायनाने भरलेल्या ड्रमचा स्फोट होऊन दोन भंगार विक्रेत्यांचा मृत्यू झाला. ठाणे

महापालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाने ही माहिती  दिली.अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचून आग विझवली. भिवंडी निजामपूर पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**<><><><><><>**

पाकिस्तानातला दहशतवादी अब्दुल रहमान मक्की ला संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादी घोषित केल्याची नोंद भारताने घेतली असून संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या यादीत मक्कीचं नाव समाविष्ट केलं आहे. हा सरकारी आदेश कालपासून ताताडीने लागू झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे.

**//<><><><><><>//**